# मराठाकालीन विहीर स्थापत्य - अहिल्यापूर, चांदवड, रमाळा व तुळजापूर येथील विहीरींच्या विशेष संदर्भात

**प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे**
इतिहास विभाग प्रमुख, भारत महाविद्यालय,जेऊर
ता. करमाळा जि. सोलापूर.



## प्रस्तावना:-

'पाणी किंवा अन्य द्रव पदार्थ जमिनीतून काढण्यासाठी केलेल्या खोदकामास विहीर म्हणतात.'[१] विहीर सुरक्षित राहावी बुजली जाऊ नये तसेच तिच्यातील पाण्याचा वापर सहज सुलभ व्हावा या हेतूने विहीर स्थापत्य विकसित होत गेले व त्यात प्रमाणबध्दता, कलात्मकता, भव्यता वाढत जाऊन या विहीरी जलमंदीराच्या स्वरुपात बांधल्या जाऊ लागल्या. विहीर स्थापत्याची भारताच्या विविध भागांमध्ये नानाविध वैशिष्टये आढळून येतात. मध्ययुगीन काळात गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेशाच्या क्षेत्रात विहीर स्थापत्यकला अत्युच्च शिखरावर पोहचलेली होती. पश्चिम गुजरातमध्ये ही कला अधिक संपन्न व विकसीत असल्याचे दिसून येते. विहीरींचे अनेक मजली बांधकाम हे तेथील मुख्य वैशिष्टये आहे. अडालज व पाटण येथील जगप्रसिध्द विहीरींबरोबरच विहीर स्थापत्याचे उत्तम नमुने ठरणाऱ्या शेकडो विहीरी गुजरात मध्ये आहेत.[२]

महाराष्ट्रभूमीतही प्राचीन काळापासून वैशिष्टयेपूर्ण विहीरी बांधलेल्या आढळून येतात. वेरुळ येथील तीर्थ विहीर, बीडची खजना विहीर, लिंब येथील बारा थारोळयांची विहीर मराठा कालीन विहीर स्थापत्याची प्रसिध्द उदाहरणे आहेत. [३] महाराष्ट्रात सर्वत्र दहा-पाच गावांमधून एखादी तरी विहीर ऐतिहासिक महत्व असणारी आढळून येते. प्रस्तुत शोध निबंधात मराठाकालीन विहीर स्थापत्याच्या अनुशंगाने काही ठराविक विहीरींबद्दल माहिती देऊन महाराष्ट्रातील विहीरस्थापत्याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

## विहीरींची आवश्यकता:-

पाणी ही समस्त प्राणीमात्रांची प्राथमिक गरज आहे. जेथे बारमाही वाहणाऱ्या नद्या आहेत, तेथे पाण्याची गरज विनासायास भागत असे. परंतु जेथे अशा नदया नाहीत तेथे पावसाचे पाणी साठवून ठेवणे आणि भूगर्भातील पाणी उपयोगात आणण्याचे तंत्र प्राचीन काळापासून मानवाने आत्मसात केले आहे. त्यासाठी विहिरी, बारवा, कुंड, तलाव, धरणे, बंधारे यांची निर्मिती केली जाते. पौराणिक कथांमध्ये या सर्वांचे उल्लेख आहेतच पण प्रत्यक्ष ऐतिहासिक पुरावा म्हणून सिंधू संस्कृतीच्या उत्खनन स्थळामध्ये आढळून आलेले सार्वजनिक स्नानगृह व त्या शेजारील विहीर, इतरत्र असणाऱ्या विहिरी यांचा उल्लेख करावा लागेल.[४] म्हणजेचे सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीपासून भारतात वरानिर्दिष्ठ साधनांच्या माध्यमातून पाणीपुरवठा करण्याची पद्धती विकसित झालेली आहे, असे म्हणता येईल.मध्ययुगीन काळात लोकसंख्या झपाट्याने वाढत जाऊन प्राचीन काळात प्रामुख्याने नद्यांकाठी वस्ती करून राहणारे लोक दूरदूरच्या प्रदेशात स्थलांतरित होत गेले. परिणामी पाणीपुरवठ्याच्या साधनांची अधिकाधिक आवश्यकता निर्माण झाली. पाणीपुरवठ्याची साधने निर्माण केल्याने मोठे पुण्यपदरी पडते अशी भारतीय जनमाणसात प्राचीन काळापासून समजूत आहे,[५] त्यात सामाजिक गरजेची भर पडली. त्यामुळे अनेक राज्यकर्त्यांनी, प्रतिष्ठित, श्रीमंत लोकांनी कर्तव्य, सामाजिक बांधिलकी आणि पुण्यसंचय म्हणून ठिकठिकाणी विहिरी, कुंड, तलाव यांची निर्मिती केली. मराठा सत्तेच्या काळात मराठा छत्रपती, पेशवे, मराठा सरदार-जहागीरदार, वतनदार व इतर काही मंडळींनी मोठया प्रमाणात विहीरी निर्माण केल्याचे दिसून येते.

## अहिल्यापूर जि. धुळे येथील विहीर :-

धुळे जिल्ह्यातील शिरपूर या तालुक्याच्या ठिकाणापासून चोपड्याकडे जाणाऱ्या मार्गाने १० कि.मी. गेल्यावर दक्षिणेस रस्ता फुटतो. या फाट्यापासून दोन कि.मी. अंतरावर अहिल्यापूर हे छोटेसे खेडेगाव आहे. मराठा अधिपत्य काळात थाळनेर किल्ला व त्या सभोवतीची गावे होळकरांच्या अखत्यारित होती.[६] थाळनेरपासून सात कि.मी. अंतरावर असणारे अहिल्यापूर गाव अहिल्याबाई होळकर यांच्या कारकिर्दीत वसविण्यात आले, म्हणूनच या गावास अहिल्यापूर नाव देण्यात आले आहे. आपल्या नावाने वसलेल्या या गावी लोकांच्या पाणीपुरवठ्याची उत्तम व्यवस्था व्हावी या उद्देशाने अहिल्याबाईंनी तेथे अतिशय भव्य व कलात्मक अशी पायविहीर बांधली असल्याचे दिसून येते. ही विहीर आजही सुस्थितीत आहे. जिल्हा गॅझेटियरमध्ये या विहिरीची विशेष नोंद घेण्यात आलेली आहे. या विहिरीजवळच दक्षिण बाजूस असणाऱ्या छोट्याशा शिवमंदिरात शिवलिंगाबरोबरच अहिल्याबाईंची मूर्तीदेखील आढळते. अहिल्यापूर येथील विहीर आयताकृती असून पूर्व-पश्चिम लांबी

सुमारे ७० फूट तर दक्षिण-उत्तर रुंदी सुमारे ३५ फूट एवढी आहे. उत्तरेकडील बाजूने विहिरीत उतरण्यासाठी सुमारे ७० फूट लांबीचा व १० फूट रुंदीचा मार्ग आहे. या मार्गाने ५६ पायऱ्या उतरल्यावर विहीर सुरू होते. विहीर सुरू होते तेथे प्रवेशद्वार आहे व त्यावर दोन कमानी आहेत. या पायऱ्या सरळ पुढच्या प्रशस्त चौकावर पोहोचतात. हा चौक साधारणपणे ५० फूट लांब व २५ फूट रुंद आहे. पूर्वी तेथे पानचक्कीची व्यवस्था होती तसेच तेथे काही धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमही केले जात असत. अशी पूर्व परंपरेने चालत आलेली मौखिक माहिती अहिल्यापूर ग्रामपंचायतीचे सदस्य श्री. रवींद्र पुंजू मोरे यांनी प्रस्तुत अभ्यासकास दिली. पानचक्कीची प्रत्यक्ष खूणही या चौकावर आढळून येते. चौकाच्या पूर्व बाजूस असणाऱ्या भिंतीस एक मोठी महिरापी कमान आहे व त्या कमानीवर पुन्हा दोन लहान कमानी आहेत. चौकाच्या उत्तरेकडून विहिरीच्या उत्तर भिंतीस खेटून खाली उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. या पायऱ्या पूर्व बाजूस उतरत जातात. जेथे या पायऱ्या संपतात तेथे एकावर एक अशा तीन कमानी आहेत. तेथून हा पायऱ्यांचा मार्ग पुन्हा दक्षिण दिशेस वळतो. काही अंतरावर पुन्हा एकावर एक अशा पाच कमानींची भिंत आहे. त्यापुढे मुख्य विहीर आहे. या सर्व बांधकामाच्या आग्नेय कोपऱ्यात ही विहीर असून ऐवढे बांधकाम असताना देखील विहिरीच्या तळापासून वर पाहिल्यास आकाशाचे दर्शन व्हावे अशी विहिरीची रचना आहे. सध्या ती गाळाने व केरकचऱ्याने भरलेली असून विहिरीत पाणी नाही. अशी ही १५० पायऱ्यांची व १३ कमानी असणारी विहीर भूपृष्ठापासून अंदाजे ९० फूट खोल असावी असे वाटते. भिंतीसाठी व कमानींसाठी विटा व चुना याचा तर पायऱ्यांसाठी घडीव दगडांचा वापर केलेला आहे. 'या विहिरीस जीवंत पाण्याचे झरे असून विहिरीत विपूल पाणी असते. गावास पाणीपुरवठ्याचे ते एकमेव साधन आहे. विहिरीतील पाणी मोटेच्या किंवा इंजिनच्या सहाय्याने विहिरी शेजारील कुंडात भरले जाते.' अशी माहिती धुळे गॅझेटियरमध्ये देण्यात आली आहे.[७] यावरून हे पाणी अलीकडील काळात कमी झाले असावे हे स्पष्ट होते. शेतीसाठी गावाच्या परिसरात पाडण्यात आलेल्या विहिरी व बोरवेल्सचा तो परिणाम असावा असे म्हणता येईल. कित्येक वर्षे अहिल्यापूर गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या या विहिरीचे बांधकाम प्रथमदर्शनी एखाद्या राजमहालासारखे वाटावे एवढे अप्रतिम आहे. मराठाकालीन विहीर बांधकामाचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण नमुना असून होळकर घराण्याच्या नावाला व अहिल्याबाईच्या कीर्तीला साजेलशी ही निर्मिती आहे.

### चांदवड जि. नाशिक येथील रंगमहाल, नजरबागेतील विहीर :-

चांदवड जि. नाशिक येथे होळकरांनी राजवाडे, मंदिरे, अन्य वास्तू यांची जशी उभारणी केली, गावाच्या भरभराटीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले तसेच गावाला मुबलक पाणी पुरवठा व्हावा या उद्देशाने अनेक विहिरीही निर्माण केल्या. चांदवड येथे होळकरांनी गावाच्या विविध भागात एकूण ११ विहीरी बांधल्याची नोंद मिळते.[८] चांदवड येथील विहिरींपैकी सर्वाधिक महत्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण विहीर म्हणून रंगमहालाशेजारी असणाऱ्या नजरबागेतील विहिरीचा उल्लेख करावा लागेल. विहीरीचे बांधकाम घडीव पाषाणाचे असून तीन कमानी व १५० पायऱ्यांची ही विहीर अत्यंत सुरेख आहे. पायऱ्या चौकोनी चिरेबंदी हौदात संपतात. हा हौद साधारण २० फूट खोल आहे. त्याखाली पाण्याचे झरे असणारे कुंड आहे. विहिरीतील पाणी आजतागायत कधीच संपूर्णपणे उपसू शकले नसल्याने विहीरीच्या एकूण खोलीचा अंदाज सांगता येत नाही. सदर विहीरीचे बांधकाम अत्यंत वैशिष्ट्येपूर्ण आणि प्रेक्षणीय असे आहे. ही विहीर सध्याही चांदवड गावाच्या पाणीपुरवठ्याचे मुख्य साधन आहे. विहीरीवर दहा हॉर्सपॉवरचा विद्युतपंप बसविलेला आहे. कितीही भयंकर दुष्काळ पडला तरी या विहीरीचे पाणी कमी होत नाही. याची अनुभूती चांदवड परिसराने गेल्या २५० वर्षांत अनेकदा घेतली आहे. दुष्काळाच्या काळात चांदवड सभोवतीच्या कित्येक गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा या विहीरीच्या माध्यमातून होत असतो.

### करमाळा जि. सोलापूर येथील कमलाभवानी मंदीराजवळील विहीर :-

करमाळा येथील कमलाभवानी मंदीर जसे मंदिर स्थापत्याच्या दृष्टीने वैशिष्टयेपूर्ण आहे त्याचप्रमाणे या मंदिराच्या पूर्वेस असणारी विहीर देखील विहीर स्थापत्याचे उत्तम उदाहरण आहे असे म्हणता येईल. या विहीरीचा आकार लंबकाच्या घडयाळाप्रमाणे म्हणजेच शिवलींगाप्रमाणे असून बांधकाम चिरेबंदी अष्टकोनी आहे. करमाळयाचे जहागीरदार निंबाळकरांनी आपल्या कुलाभिमानातून कमलाभवानी मंदीराचे बांधकाम करताना ९६ खांब, ९६ ओवऱ्या, ९६ शिल्पे, हे सर्वत्र ९६ चे सुत्र पाळताना या विहीरीच्या पायऱ्यांची संख्या देखील ९६ ठेवल्याचे दिसून येते.[९] या विहीरीत उतरण्याचा मार्ग उत्तरेकडून दक्षिणेकडे असून दोन्ही बाजूने भक्कम भिंती आहेत. हा मार्ग १६ फुट रुंद व ७२ फुट लांब आहे. ९६ पायऱ्यांचा हा मार्ग उतरणे चढणे सोयीचे जावे म्हणून त्यास मध्ये मध्ये १० टप्पे ठेवलेले आहेत. ९० पायऱ्या उतरल्यावर एक मोठी आकर्षक महिरापी कमान आहे. त्यापुढे ६ पायऱ्या उतरल्या की मुख्य अष्टकोनी विहीरीचे संपूर्ण दर्शन होते. पायऱ्या व बांधकाम जेथे संपते त्या खाली नेहमीच पाणी असल्याने खोली नक्की सांगता येत नाही. बांधकामाची उंची ६० फुट आहे थारोळे दक्षिण बाजूस आहे व त्याखालच्या भिंतीचे बांधकाम एक सलग आहे. उर्वरीत बांधकामास ३ टप्पे देण्यात आल्याने मजबूतीच्या दृष्टीने ते फायदयाचे झाले आहे. शिवलिंगाचा आकार, चिरेबंदी बांधकाम, भव्यता व प्रमाणबध्दता ही या विहीरीची ठळक वैशिष्टये आहेत. पूर्वी या विहिरीवर हत्तीची मोट चालत होती असे वृध्द लोक परंपरेने सांगतात.

तुळजापूर येथील तुळजाभवानी देवीच्या मंदीरासमोरच्या मुख्य रस्त्यावर अहिल्याबाई होळकर यांनी एक विहीर बांधलेली आहे. ही विहीर संपुर्ण काळया रेखीव दगडांनी बांधलेली आहे. पहिल्या पायरीवर दोन कासवे कोरलेली आहेत. दहाव्या पायरीवर दोन्ही बाजूस शिलालेख आहेत त्यापैकी उजव्या बाजूच्या संस्कृत शिलालेखाचा मराठी अनुवाद असा आहे की, 'पृथ्वीवर किर्तीने प्रसिध्द असलेल्या मल्हाररावाची सून व खंडोराचाची पत्नी नर्मदा किनारी राहणाऱ्या अहिल्याबाईने श्री देवीच्या चरणाजवळ जगाच्या कल्याणासाठी पवित्र पाणी असलेली ही विहीर

शालिवाहन शके १७०७ मध्ये बांधून दिली.' [१०] या विहीरीला आजही भरपूर पाणी आहे. पाण्याच्या वर ५५ पायऱ्या आहेत. अठराव्या पायरीवर एक गोलाकार कमान असून त्यावर कोरीवकाम केलेले आहे तसेच रहाटाची व्यवस्था करण्यात आल्याचे आढळते. कमानीच्या समोरच्या भींतीवर एक लहान पण आकर्षक गणपती मंदीर आहे. विहीरीत असणाऱ्या झऱ्यास गोमुख तीर्थ असे नाव असून त्यातून अखंड पाणी पडत असते.

शेतीसाठी पाणीपुरवठा होऊन शेतीबागाईत व्हावी म्हणून मराठा सरकारने विहीरी पाडून बागाईत शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत व सवलती दिल्या होत्या. [११] त्यामुळे शेतीसाठी देखील मोठया प्रमाणात विहीरी बांधण्यात आल्या या विहीरींच्या स्थापत्यामध्ये गरजेनुसार काही विभिन्नता आढळून येते.

## निष्कर्ष :-

महाराष्ट्रात मराठा सत्तेच्या काळात मंदीरे व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मोठया प्रमाणात विहीरी बांधल्या गेल्या. भावीक भक्तांच्या, यात्रेकरुंच्या सोयीसाठी या विहीरी बांधण्यात आल्या. गावातील लोकांसाठी पाणीपुरवठा व्हावा या उद्देशाने प्रत्येक गावांमध्ये अनेक विहीरी निर्माण झाल्या. सर्वसाधारणपणे मंदीरे, तीर्थक्षेत्रे व राजवाडयांजवळील विहीरींचे बांधकाम कलात्मक आणि भव्य आहे. या विहीरी स्थापत्यकलेच्या दृष्टीने आधिक संपन्न वाटतात. गावास पाणी पुरवठा करणाऱ्या विहीरींमध्ये महिला, वृध्द सर्वांनाच सहज उतरता चढता यावे आणि उन्हाळयातील पाणी पातळी विचारात घेऊन पायऱ्या बांधलेल्या आढळतात. शेतीतील विहीरींचे बांधकाम सामान्यत: दगडी तोडींचे, गोलाकार व पायऱ्यांना कमी महत्व देणारे आहे. काही मातब्बर, हौशी प्रतिष्ठीत शेतकऱ्यांनी शेतातील विहीरीही चिरेबंदी व कलात्मक बांधलेल्या आहेत. मोटेसाठी थारोळयांचे बांधकाम हे शेत विहीरींच्या बांधकामातील खास वैशिष्टयेपूर्ण बाब आहे. साधारण अथवा भव्य दिव्य, कलात्मक बांधकाम असणाऱ्या सर्वच विहीरी आपल्या आंतर्भागातील पाण्याबरोबरच त्या वस्तीचा, वाडीचा, गावाचा, तिर्थक्षेत्राचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहास जतन करुन आहेत. मराठाकालीन विहीर स्थापत्याचा सखोल अभ्यास झाल्यास महाराष्ट्रातील स्थापत्यकलेच्या पर्यायाने सामाजिक, सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर पडेल.

## संदर्भ :-


१) रेगे मे.पुं. संपा. मराठी विश्वकोश खंड १६, १९९९ पृ. ९६०
२) वेबसाईट www.dnaindia.com stepwell architecture a classic example.
३) रेगे मे.पुं. संपा. उपरोक्त पृ. ९६१
४) परळकर आर.के., मानवी संस्कृतीचा इतिहास, अलाहाबाद, १९८९ पृ ७०
५) जोशी महादेव शास्त्री संपा. भारतीय संस्कृतीकोश खंड ९ पृ १०.
६) ठाकूर वा.वा. संपा. होळकरशाहीच्या इतिहासाची साधने खंड १ पृ ९३-९४
७) Kunte G.B. ed. Maharastra State Gazetteer, Dhulia District Second Edition.(Revised) 1974 P- 791
८) Gawade S.B. ed. Devasthan Classification List. Private State Indore. Holkar Govt. Press 1923 P-324-25
९) दीक्षित अनंत संपा. सकाळ देवस्थान विशेषांक, आक्टोबर २००२ पृ. १०८
१०) गर्ग रामसेवक, शर्मा हिरालाल संपा. अहिल्या स्मारिका इंदोर १९७९ पृ २६
११) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे त्रेमासिक वर्ष १५ अंक २ पृ ६७-६८
१२) भावे वा.कृ.पेशवेकलीन महाराष्ट्र नवी, दिल्ली १९७६ पृ ३५३-५४